आर.सी.सी.नं. ६२६/२०२४

निशाणी ५

**<u>फिर्यादीची शपथेवर पडताळणी</u>**

मी सत्य प्रतिज्ञेवर सांगतो की,

माझे नांव – सोनाली रमेश काकडे

वय – ३० वर्षे, धंदा – शेती,

राहणार – कापुरवाडी, दत्तवाडी, ता. जिल्हा अहमदनगर

१) माझ्या पतीचे नांव रमेश काकडे, सासूचे नांव चंद्रभागा काकडे व सासरे गोपीनाश शंकर काकडे, मुलगा पियुष रमेश काकाडे, मुलगी सृष्टी रमेश काकडे असे आम्ही गट नंबर २४०/1 मध्ये एकत्र रहातो. आमचे शेजारी भाऊसाहेब श्रीपती गाडगे, मंदाबाई भाऊसाहेब गाडगे, मनोज भाऊसाहेब गाडगे, निर्मला मनोज गाडगे हे रहातात. आमचे त्यांच्याशी वाद आहेत. दिनांक ०९/०५/२०२४ रोजी सकाळी ११–०० वाजेच्या सुमारास आमच्या शेळया का हाकलल्या यावरुन त्यांनी राग धरुन माझ्यासोबत वाद केला. मनोज याने त्याच्या हातातील काठीने मला मारहाण केली, भाऊसाहेब याने मला झापडीने मारले, मंदाबाई व निर्मला यांनी माझी गचांडी धरली व मनोज याने माझ्या पाठीवर काठीने मारहाण केली. त्यावेळेस माझे सासरे वाद मिटविण्यासाठी आले असता मनोज याने त्यांच्या मांडीवर, छातीवर काठीने मारहाण केली. माझी मुलगी सृष्टी, वय १४ वर्षे मोबाईल मध्ये शुटींग काढत असतांना तिची मंदाबाई हिने गचांडी धरली व भाऊसाहेब यांनी तिच्या हातातील मोबाईल फेकून दिला. त्यामुळे काही भागाची शुटींग झाली. त्यानंतर आम्ही कॅम्प पोलिस स्टेशन, अहमदनगर येथे तक्रार देण्यासाठी गेलो. परंतू पोलिसांनी आम्हाला काठीने मारहाण केल्याची तक्रार नोंदविली नाही व त्यांनी मला व माझ्या सास–यांना सरकारी दवाखाण्यात उपचारासाठी पाठविले. त्यामुळे आम्ही डी एस पी ऑफीस येथे तक्रार केली व कॅम्प पोलिस स्टेशन येथे पोष्टाने तक्रार केली. मला न्याय मिळावा ही विनंती.

(सोनाली रमेश काकडे)
फिर्यादी

समक्ष

(एल.एस.पाढेण)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.३, अहमदनगर.

अहमदनगर.
दिनांक – ०५/०७/२०२४.